ISSN2249-894X Impact Factor :3.1402 (UIF) Volume- 5 |Issue- 11 |August - 2016

Review Of Research

# सत्यशोधक स्त्रियांचे वैचारिक लेखन

डॉ. तानाजी अंबादास देशमुख
मराठी विभागप्रमुख,
वसुंधरा कला महाविद्यालय, जुळे सोलापूर.

## प्रस्तावना

महात्मा फुले यांनी शेतक-यांबरोबरच स्त्रियांच्या समानतेसाठी व सन्मानासाठी सुरू केलेला लढा आजपर्यंत सुरूच आहे. आजच्या काळात या लढयाला व्यापक रूप प्राप्त झाले असले, तरी स्त्री शोषणाची परंपरा अखंडीत सुरूच आहे. फुले नंतर ही या सत्यशोधक चळवळीने स्त्री प्रश्नाची अत्यंत महत्त्वपूर्ण मांडणी केली. सर्व स्त्रिया शोषित असतात या विधानातील फोलपणा दाखविला.भारतासारख्या देशात स्त्रियांचे शोषण धर्मव्यवस्था, जातीव्यवस्था आणि पुरूषप्रधान संस्कृती करते .म्हणूनच विषमतेने बध्द असलेल्या या श्रेण्यानुसार स्त्रियांचे शोषण होते हा विचार प्रथम सत्यशोधक चळवळीने मांडून स्त्री विषयक प्रगमनशिल विचार व्यक्त केले.

भारतातील स्त्रियांना आपण माणूस आहोत याची जाणीव करून देण्याची आवश्यकता म. फुल्यांना वाटत होती. यासाठी स्त्रियांना शिक्षण दिले पाहिजे ही भूमिका फुलेंनी स्वीकारली. त्यांनी १८४८ साली पुण्यात मुलींची पहिली शाळा सुरू केली. ही सामाजिकदृष्टया फार महत्त्वाची गोष्ट होती.

स्त्रियांना शिक्षणाची संधी मिळाली. शिक्षणामुळे त्यांना आत्मभान आले. यामुळेच महाराष्ट्रातल्या कानाकोप-यातील स्त्रियांनी उल्लेखनीय कार्य केले. यामध्ये स्त्रीमुक्तीच्या आद्य प्रणेत्या सावित्रीबाई फुले, आधुनिक स्त्रीवादी साहित्याच्या जनक ताराबाई शिंदे, रयत माऊली लक्ष्मीबाई भाऊराव पाटील, पहिल्या सत्यशोधकीय विवाहकर्त्या राधाबाई आल्हाट, राधाबाई मुकुंदराव पाटील, इंदूताई दिनकरराव जवळकर, मंजुळाबाई कृष्णराव भालेकर, मानवमुक्तीचा वैचारिक आशय मुक्ता साळवे, यमुनाबाई घोडेकर, रत्नम्मा रामय्या अय्यावारू, फातिमा शेख, सौ. कमलाबाई खंडेराव बागल, सौ. हौसाबाई माधवराव बागल, काशीबाई सासणे वगैरे स्त्रियांचे सत्यशोधक चळवळीतील योगदान महत्त्वाचे आहे. या मधील कांही स्त्रियांना आपले विचार सर्वदूर पसरविण्यासाठी कसदार वैचारिक लेखन केले आहे. त्याचा आढावा आपणांस येथे घ्यावयाचा आहे.




## सावित्रीबाई फुले.(१८३१-१८९७)

भारतीय प्रबोधन युगातील पहिल्या भारतीय शिक्षिका, स्त्रीमुक्तीच्या उद्गात्या म्हणून क्रांतिज्योती सावित्रीबाई यांच्याकडे पाहतो. सावित्रीबाई यांच्या 'काव्यफुले'(१८५४) व 'बावन्नकशी सुबोध रत्नाकर'(१८९२) या काव्यपुस्तिका प्रसिध्द आहेत. काव्यफुले मध्ये एकूण ४१ कविता असून यापैकी आठ, दहा कविता समकालीन विषयाची मांडणी करणा-या आहेत. 'बावन्नकशी सुबोध रत्नाकर' या काव्यपुस्तिकेत भारताचा प्राचीन काळापासूनचा इतिहास काव्यस्वरूपात अचूकपणे विशद केलेला आहे. यामध्ये जोतिबा फुले आणि सावित्रीबाई या दांपत्यांच्या विचारांचे , जीवनदृष्टीचे दर्शन घडते.

सावित्रीबाई यांचे 'सावित्रीबाईची भाषणे ' (१८७२), 'जोतिबांची भाषणे' (१८५६) आणि 'सावित्रीबाईंची जोतिबास पत्रे' हे वैचारिक साहित्य प्रसिध्द आहे. 'जोतिबांची भाषणे ' सावित्रीबाईंनी संपादित केली असून या भाषणांमध्ये पशुपक्षी व

मानव, रानटी अवस्थेतील मानव व त्यांमधील सुधारणूक , बळी राजा असे विषय आलेले आहेत. यामध्ये 'इतिहास', 'सुधारणूक' व 'गुलामगिरी' असे भाषणांचे विषय आलेले असून 'गुलामगिरी' या भाषणामध्ये प्राचीन काळापासून चालत असलेल्या गुलामगिरी प्रथेचा आलेख मांडला आहे.

'सावित्रीबाईंची भाषणे' (१८९२) शास्त्री नारोबाबाजी महाधट पाटील यांनी प्रकाशित केली आहेत. या ग्रंथातील भाषणांचे विषय 'उद्योग', 'विद्यादान', 'सदाचण', 'व्यसने', 'कर्ज' अशा प्रकारचे आहेत. यावरून या भाषणाचे सामाजिक मूल्य आधोरेखित होते. 'उद्योग' या भाषणात सावित्रीबाई म्हणतात, "न थकता दिवसभर उद्योग करणे हा मनुष्याचा उत्तम धर्म असून तो त्याचा खरा कल्याण करणारा मित्र होय. ..आपल्या देशात थोडेसे इंग्रज लोक व्यापाराला आले आणि त्यांनी एक प्रचंड राज्य स्थापन केले. हा दृढ उद्योगाचा आणि बुध्दिशक्तीचा चमत्कार आहे. त्यात दैवाचा संबंध नाही. देव, प्रारब्ध यांवर विश्वास ठेवणारे लोक आळशी व भिकारी असून त्यांचा देश नेहमीच दुस-याच्या गुलामगिरीत राहतो. याचे ढळढळीत उदाहरण म्हणजे आपला हिंदुस्थान होय. "[i] उद्यमशीलतेबाबतचे सावित्रीबाईचे महत्त्वपूर्ण विचार येथे मांडले आहेत.

महात्मा फुले यांच्या मार्गदर्शनाखाली सावित्रीबाईनी 'महिला सेवा मंडळा' ची स्थापना केली . या मंडळातर्फे १४ जानेवारी १८५२ रोजी सर्व स्त्रियांसाठी तिळगूळ समारंभ आयोजित केला होता. या समारंभाची निमंत्रण पत्रिका तयार केली होती.

### निमंत्रण पत्रिका: १३/१/१८५२

ता. १४/१/१८५२ रोजी पुणे कलेक्टर साहेबांच्या पत्नी मिसेस ज्योन्स यांचे अध्यक्षतेखाली सार्वजनिक तिळगूळ समारंभ होणार आहे. तरी सर्व स्त्रियांनी आपल्या लेकी सुनांना घेऊन यावे. समारंभ संध्याकाळी ५ वाजता आहे. कोणत्याही जातीच्या किंवा धर्माच्या बायका आल्या तरी त्या एकाच जाजमावर बसतील. जातिभेद किंवा पक्षपात न करता सर्वांना सारखेच धरुन हळदीकुंकू लावण्यात येईल आणि तिळगूळ वाटण्यात येईल.

**सौ. सावित्रीबाई भ्रतार जोतिराव फुले**
सेक्रेटरी : महिला सेवा मंडळ

या समारंभास सगुणाबाई क्षीरसागर, सरस्वतीबाई गोवंडे, सौ. आक्कासाहेब भ्र गणेश जोशी, सौ. उमाताई सिध्देश्वरशास्त्री, हणमंताबाई अय्यावारू, सावित्रीबाई रोडे, राधाबाई लोखंडे यांनी कार्य केले. सावित्रीबाईनी या निमंत्रण पत्रिकेत केवळ तिळगूळ समारंभच आयोजित केला नाही तर सामाजिक दृष्टीने महत्त्वाचे कार्य केले आहे. [ii]

### १. मुक्ता साळवे

महात्मा फुले यांनी पुण्यात सुरु केलेल्या शाळेत शिकणारी मुक्ता साळवे ही एक मातंग समाजातील विद्यार्थिनी होती. या मुक्ताने तीन वर्षे या शाळेत विद्याभ्यास केल्यानंतर वयाच्या चौदाव्या वर्षी 'मांग महारांच्या दु:खाविषयी निबंध' लिहिला. 'ज्ञानोदय' पत्राचे संपादक डॉ. सॅम्युएल बेकन यांनी या फुले यांच्या शाळेस भेट दिली. तेंव्हा मुक्ता साळवे हिने त्यांच्यासमोर त्या निबंधाचे वाचन केले. या निबंधाने प्रभावित होऊन डॉ. बेकन यांनी त्या निबंधात कांही ही फेरफार न करता हा निबंध 'ज्ञानोदय' च्या १५ फेब्रुवारी व १ मार्च १८५५ च्या अंकामधून प्रसिध्द केला. महात्मा फुले गौरव ग्रंथाच्या दुस-या सुधारीत आवृत्तीमध्ये परिशिष्ट -७ मध्ये हा निबंध समाविष्ट करण्यात आला आहे. या निबंधातून मुक्ताची लेखनशैली व विचारप्रवृत्ती प्रतित होती.

मुक्ता साळवे यांनी या निबंधात धर्मव्यवस्था, राज्यव्यवस्था आणि समाजव्यवस्था यांची बध्दीवादी परखड चिकित्सा केलेली आहे. या व्यवस्थांमध्ये समकालीन मांग- महारांचे स्थान कोणते ? या प्रश्नांचा तर्कशुध्द व अभ्यासपूर्ण शोध तिने घेतला आहे. वैदिक धर्मव्यवस्था व ब्राह्मणशाही यांचे स्वार्थी हितसंबंध तिने उघडे पाडलेले आहेत. दलितांना धर्म पुस्तक पाहण्याची मुबा नाही, त्यांचे अवलोकन केल्यास महापाप घडते. यांसारख्या ब्राह्मणी मतांमुळे आम्ही धर्मरहीत आहोत, असे मुक्ताने ठामपणे सिध्द केलेले आहे. , ' ज्या धर्मव्यवस्थेचा एकानेच लाभ घ्यावा व इतरांनी फक्त त्याच्या तोंडाकडे पाहावे असे पक्षपाती धर्म पृथ्वीवरुन नष्ट होवोत व अशा धर्माचा अभिमान करावा असे आमच्या मनात देखील न येवो,' असे विधान ती करते. या निबंधात ती म्हणते, 'पंडीत हो, तुमचे स्वार्थी अप्पलपोटे पांडित्य पुजेसहित एकीकडे गुंडाळून ठेवा. आणि मी सांगते याजकडे लक्षपूर्वक कान द्या. ज्या वेळेस आमच्यातल्या स्त्रिया बाळंत होतात त्या वेळेस त्याच्या घरावर छप्परसुध्दा नसते, म्हणून हीव, पाऊस व वारा याच्या उपद्रवामुळे त्यांस किती दु:ख होत असेल बरे! याचा विचार स्वत:च्या अनुभवावरून करा. जर एखाद्या वेळेस त्यांस बाळंतरोग झाला तर त्यांस औषधास व वैद्यास पैसा कोठून मिळणार! हा जुलूम विस्ताराने लिहू लागले तर मला रडू येते.'दलितांच्या दु:खाचे हृदयद्रावक वर्णन मुक्ताने केलेले आहे. याला जबाबदार असलेल्या व्यवस्थेचा खरपूस समाचार घेतला आहे. हा निबंध म्हणजे महाराष्ट्रातील दलित, स्त्रीवादी, शोषित, वंचित समाजाच्या दु:खाचा व त्या विरोधातील विद्रोहाचा प्रथम आविष्कार आहे.

## २. ताराबाई शिंदे

ताराबाई या सत्यशोधक समाजाच्या वातावरणात व संस्कारात वाढल्या . सन १८८२ साली प्रसिध्द झालेला ताराबाई शिंदे यांचा ' स्त्री - पुरुष तुलना '[६] हा वैचारिक ग्रंथ महत्त्वाचा आहे .या पुस्तकात स्त्री पुरुषांमधील असमतोल दूर करुन स्त्री जातीला न्याय्य मिळवून देण्यासाठी क्रांतिकारी विचार मांडले आहेत. पुस्तकात तीन विषयांची मांडणी ताराबाईनी केली आहे. पुनर्विवाहाला बंदी असल्याने स्त्रियांची होणारी कुचंबना, वैधव्याचे दु:ख आणि पुरुषांनी केलेले अत्याचार व अन्याय हे तपशीलवार सांगितले आहेत. विवाहित स्त्रियांचे पुरुषांकडून व समाजाकडून होणारे शोषण याचे विवेचन केले आहे. शेवटी पुरुषांच्या दुर्गुणांची कारणमीमांसा केली आहे. एकंदरीत ताराबाई शिंदे यांनी भारतीय धर्मव्यवस्था, धर्मग्रंथ, पोथ्यापुराणे व समाज व्यवस्थेतील स्त्रीच्या दुय्यमत्वाची तर्कशुध्द चिकित्सा करुन पुरुषप्रधान मानसिकतेवर हल्ला चढविला आहे.

ताराबाई शिंदे यांचे तत्कालीन मराठी साहित्यातील सौंदर्यवादी 'मुक्तामाला' आणि 'मंजुघोषा' या कादंब-या, 'मनोरमा' नाटक, 'स्त्रीचरित्र' अशा प्रकारच्या साहित्याचे वाचन होते. अशा ग्रंथांविषयी त्या म्हणतात, " ग्रंथकर्त्यांनी आपण जे काही लिहितो हे घडण्यासारखे किंवा पूर्वी कधी काळी असे घडून आले होते किंवा नाही याचा आधी विचार करून मग पुढे ग्रंथ रचावा."[iii] या काळातील अशा पुरूषांनी लिहिलेल्या मनोरंजनपर साहित्याची समीक्षा स्त्रीवादी दृष्टिकोनातून करतात. ही त्या काळातील समीक्षेच्या दृष्टिने खूप महत्त्वपूर्ण घटना आहे. त्यांचे वाचन विस्तृत होते आणि दृष्टी चिकित्सक होती याची साक्ष हा निबंध वाचतांना आपणास येते.

'स्त्री- पुरूष तुलना' या निबंध लेखनानंतर ताराबाई यांनी पुढे लेखन केले नाही. कसदार आणि महत्त्वपूर्ण लेखन करून ताराबाई थांबल्या. त्यांच्या या निबंधापासून प्रंरेणा घेऊन पं. रमाबाईंनी 'स्त्रीधर्मनीती' नावाचा ग्रंथ लिहिला. आजच्या मराठी स्त्रीवादी साहित्याच्या प्रेरणा म्हणजे ताराबाई आहेत.

ताराबाई यांनी एक स्त्री जगत असतांना, एक व्यक्ती म्हणून तत्कालीन स्त्री-पुरुषांच्या जीवनाचे सखोल चिंतन, निरीक्षण करून, समकालीन तसेच जुन्या साहित्याचा अभ्यास करून पुरुष संस्कृतीवर हल्ला चढविला आहे. यामध्ये स्त्री-पुरूष यांपैकी कोणी एक श्रेष्ठ नसून स्त्री-पुरूष समानतेचा विचार त्या मांडतात. यातून त्यांची् प्रग्लबता दिसून येते.

## ३. तानुबाई बिर्जे

तानुबाई बिर्जे यांनी दिनबंधु ची धुरा १९०८ ते १९१३ या काळात समर्थपणे पेलली. त्यांनी शिक्षण, स्त्रिया आणि राजकीय विषयांवर संपादकीय लेखन केले आहे. 'बहुमतलोकानुसार राज्यपध्दतीस हिंदुस्थान लायक आहे काय ? या शीर्षकाच्या चार लेखात [iv] हिदुस्थानातील बहुजनसमाज अंधारात आहे, प्रस्तुत प्रश्नार्थक बाबीस हिदुस्थस्तान लायक होण्यास आवधी आहे ,असे मत त्यांनी व्यक्त करुन प्रचलित धर्मशास्त्राचा अर्थ समतेस पुष्टीकारक होईपर्यंत हिंदुस्थान बहुमतानुसारी राज्यपध्दतीस लायक होईल की नाही याबद्दल त्यांनी शंका व्यक्त केली. बहुजनसमाजातील खरी दु:खे व स्थिती सरकारच्या नजरेस आणण्यासाठी ग्रथ लेखनाची त्यांनी गरज व्यक्त केली आहे.[v]

## ४. इतर सत्यशोधक स्त्रियांचे वैचारिक लेखन

विद्यादेवी सावित्रीबाई रोडे यांची कांही भाषणे , निबंध व वैचारिक लेखन उपलब्ध आहेत. ' विद्या शिकल्याचे फायदे' या निबंधामध्ये त्यांनी ब्राह्मण जातीची उत्पत्ती व ब्राह्मण कोणास म्हणावे, याची साधार मांडणी केली आहे. या निबंधाचा एकच भाग आज उपलब्ध आहे. ( दीनमित्र, २१ जुलै १९१५) . त्यांनी 'शिक्षण' ( १९१४) , ' रामोशी' , ( १९२१) 'विद्येचा प्रकाश' ( १९२३) या विषयांवरील निबंध सत्यशोधक परिषदा व रामोशी परिषदांमध्ये वाचले. सत्यशोधक समाजाच्या विचार व कार्यातून सामाजिक आत्मभान आलेल्या पार्वतीबाई महाधट, गंगूबाई खेडकर, लक्ष्मीबाई नायडू, यमुनाबाई गोडेकर , शांताबाई चव्हाण, जानक्का शिंदे आदी स्त्रियांचे विचार व लेखन सत्याशोधकीय विचारातून स्त्रीजीवनाचा अन्वयार्थ लावते.

## ५. समारोप

सत्यशोधक चळवळीत स्त्रियांचा प्रत्यक्ष सहभाग अत्यंत कमी राहिला आहे. म. फुले यांनी स्त्री- पुरुष समता व स्त्रीविकासासाठी कार्य व लेखन केले. स्त्रियांना आपण माणूस आहोत याची जाणीव करुन दिली. त्यांनी १८४८ साली पुण्यात मुलींची पहिली शाळा सुरू केली. ही सामाजिकदृष्टया फार महत्त्वपूर्ण घटना आहे. सत्यशोधक समाजाच्या प्रारंभापासून समाजाच्या कार्यात स्त्रियांचा सहभाग अत्यल्पच होता. म. फुले यांच्या नंतर महाराष्ट्रात सर्वदूर सत्यशोधक चळवळ विस्तारली , मात्र 'स्त्री' उपेक्षित राहिली. सत्यशोधक समाजाचे कार्य मुख्यत: शेतकरी, कष्टकरी जनसमूहांमध्ये होते. बहुजन समाजातील आर्थिकदृष्टया सुस्थिर, संपन्न वर्गात पारंपरिक सरंजामी मानसिकता यात अधिक प्रबळ होता. यामुळे स्त्रीजागृती, स्त्री प्रश्नांची सोडवणूक, स्त्री-पुरुष समानता यापासून बहुजन समाज, शेतकरी-कष्टकरी जनसमूह दुर राहिला. याचा परिणाम या वर्गातील स्त्री- दास्य व स्त्री - दैन्यात फारसा समाधानकारक बदल झालेला नाही.

सत्यशोधक चळवळीतील स्त्रियांचा अत्यल्प सहभाग पाहिल्यावर ज्या कांही स्त्रियांनी या चळवळीत सक्रीय सहभाग घेतला.त्या लिहू लागल्या. स्त्रियांनी समाजप्रबोधनांसाठी वैचारिक कार्य व लेखन केले. त्यांचे वेगळेपण व महत्त्व आज ही उठून दिसत आहे. दुर्दैवाने आज त्यांच्याविषयी माहिती उपलब्ध होत नाही. जी उपलब्ध होते ती फारच त्रोटक स्वरुपात असते. त्यावरुन एखाद्या विशिष्ट घटना-प्रसंगातील त्यांचा सहभाग व त्यांच्या दृष्टिकोन यांची पुसटशी कल्पना येते.

भारतीय प्रबोधन युगातील पहिल्या भारतीय शिक्षिका, स्त्रीमुक्तीच्या उद्गात्या, महिला शिक्षणाच्या पहिल्या पुरस्कर्त्या म्हणून क्रांतिज्योती सावित्रीबाई यांच्याकडे पाहतो. त्यांनी अध्यापनासाठी घराबाहेर टाकलेले पहिले पाऊल हीच आधुनिक भारतीय स्त्रीच्या सार्वजनिक जीवनाची खरी सुरूवात आहे. हजारो वर्षापासून समाजव्यवस्थेत ज्यांना नाकारले होते त्या उपेक्षित समाजास विद्यादानाचे कार्य त्यांने केले. आपल्या लढयाला वैचारिक अधिष्ठान देऊन लोकजागृती करण्यासाठी मौलिक लेखन केले. या लेखनातून सावित्रीबाईंच्या प्रतिभासंपन्नतेची चुणूक दिसते. तसेच म. फुले आणि सावित्रीबाई या दांपत्याच्या विचारांचे, जीवनदृष्टिचे आणि समर्पित वृत्तीचे दर्शन घडते.

सत्यशोधक चळवळीमुळे स्त्रियांना शिक्षणाची संधी प्राप्त झाली. त्यांना आत्मभान आले. याचे उत्तम उदाहरण म्हणजे मुक्ता साळवे . मुक्ता साळवे यांनी अवघ्या चौदाव्या वर्षी 'मांग महारांच्या दु:खाविषयी निबंध' लिहून स्वजातीच्या दु:खाची कैफियत मांडली. त्यानी या निबंधात धर्मव्यवस्था, राज्यव्यवस्था आणि समाजव्यवस्था यांची बध्दीवादी परखड चिकित्सा केलेली आहे. दु:खाला जबाबदार असलेल्या व्यवस्थेचा खरपूस समाचार घेतला आहे. हा निबंध म्हणजे महाराष्ट्रातील दलित, स्त्रीवादी, शोषित, वंचित समाजाच्या दु:खाचा व त्या विरोधातील विद्रोहाचा प्रथम आविष्कार आहे.

सत्यशोधकीय वातावरणात व संस्कारात ताराबाई शिंदे यांचे व्यक्तिमत्त्व घडले. म. फुलेंच्या विचारांचा व तत्त्वज्ञानाचा त्यांच्यावर प्रभाव होता. सन १८८२ साली प्रसिध्द झालेला ताराबाई शिंदे यांचा ' स्त्री - पुरुष तुलना ' हा वैचारिक ग्रंथ महत्त्वाचा आहे. या ग्रंथात त्यांनी स्त्री म्हणून जगताना, एक व्यक्ती म्हणून तत्कालीन स्त्री-पुरूषाच्या जीवनाचे सखोल चिंतन, निरीक्षण करून, समकालीन तसेच पूर्व साहित्याचे अवलोकन करुन पुरूषांवर हल्ला चढविला आहे. परंतु या लेखनात स्त्री- पुरूषांपैकी कोणी एक श्रेष्ठ नसून स्त्री-पुरूष समानतेचा विचार प्रसूत केला आहे.

सत्यशोधकीय धाडसी स्त्रियांनी पारंपरिक कृषिजन समूहामध्ये जगताना समाजप्रवाहाच्या विरुध्द पोहण्याचा प्रयत्न केला ही उल्लेखनीय आहे. त्यांना होणारा विरोध, त्यांच छळ, मानहानी वगैरे पचवत त्या खंबीरपणे उभ्या राहिल्या. त्यांनी आपल्या कार्यातून व वैचारिक लेखनातून समाजिक प्रबोधनाचे व परिवर्तनाचे प्रयत्न केले. या स्त्रियांचे ऐतिहासिक कार्य आज उजेडात आणण्याची गरज आहे.

## संदर्भ सूची

[i] . माळी, मा. गो., संपा., सावित्रीबाई फुले समग्र वाड्.मय, १९९८, पृ. क्र.९४

[ii] . झोडगे, फुलवंताबाई, पहिली भारतीय शिक्षिका: सावित्रीबाई फुले , नागपूर, आ.दु.,१९९४, पृ २२.

[iii] . खोले, विलास, संपा. स्त्री-पुरूष तुलना, पृ. १२५

[iv] . 'दीनबंधु, ३,१०,२४,३१ ऑगस्ट १९१२

[v] . 'दीनबंधु, १३ जुलै १९१२.